# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, ठाणे शहर

**P.R.O. OFFICE, DCP ZONE-1, THANE CITY**

THANE POLICE COMMISSIONERATE

Address- Office of Dy.Commissioner of Police, Zone-1, Thane,
Jail Road Thane, Near Old R.T.O.Office, Opp. Central Ground, Thane (w)
Maharashtra 400601
Email Id- cp.thane.pro@mahapolice.gov.in Contact No: +919819028279


प्रेस नोट दिनांक :- ३०/०३/२०२४

## शिळ डायघर पोलीस स्टेशन, ठाणे शहर हद्दीतील मुलाची हत्या करणारे आरोपी जेरबंद

दि.२६/०३/२०२४ रोजी १८:४७ वा. फिर्यादी नामे जरीना खातुन शाह,वय-३५ वर्षे, व्यवसाय-गृहिणी,राह. रईस चाळ, ठाकुर पाडा, डोंगर पायथ्याजवळ, दहिसर, ता. जि. ठाणे यांनी पोलीस ठाणेस हजर राहुन तक्रार दिली की, दिनांक २५/०३/२०२४ रोजी १९:०० वाजेच्या सुमारास त्यांचा मुलगा सानु अहमद वय १२ वर्षे हा राहते घरातुन खेळण्यास बाहेर गेला होता. परंतु बराच वेळ झाला तरी तो घरी परत आला नाही. म्हणुन त्याचा शोध घेतला असता तो मिळुन आला नाही त्यामुळे त्याला कोणीतरी अज्ञात इसमाने फुस लावून पळवून नेले असावे. फिर्यादीने दिलेल्या तक्रारीप्रमाणे जबाब नोंद करून शिळ डायघर पोलीस स्टेशन गुन्हा रजि. नं. ६७५/२०२४ भा.द.वि.कलम-३६३ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला व तपास चालु करण्यात आला.

**बळीत मुलाचा शोध:** सदर गुन्हयाचा तपास चालु असताना यातील अपहरत मुलगा हा तळोजा पोलीस ठाणे,नवी मुंबई हद्दीत आडीवली किरवली गावाजवळील ओढयातील पाण्याच्या डबक्यात हातपाय बांधलेल्या व डोक्यास जखमा असलेल्या मयत स्थितीत तळोजा पोलीस ठाणेस मिळुन आला. त्याबाबत तळोजा पो.स्टे. येथे अकस्मात मृत्यु प्रकरण दाखल करण्यात आले. सदर वेळी तळोजा पोलीस स्टेशनचे पोलीसांनी त्याच्या आईशी संपर्क साधुन ओळख पटविली असता तो मुलगा नमुद गुन्हयातील बळीत मुलगा असल्याचे निष्पन्न झाले. म्हणुन तळोजा पोलीस ठाणेने अकस्मात मृत्यु प्रकरणाचे कागदपत्रे शिळ डायघर पोलीस ठाणेस वर्ग केली. त्यावरून नमुद कागदपत्रे गुन्हयात समाविष्ट करून नमुद गुन्हयात कलम ३६४,३०२ भादवि प्रमाणे कलम वाढ करून तपास चालु केला.

**तपास :-** त्यादरम्यान सदर गुन्हयातील अज्ञात आरोपीचा शोध घेणेकामी मा. वरिष्ठांचे सुचना व मार्गदर्शनानुसार शिळ डायघर पोलीस ठाणे तसेच मुंब्रा, कळवा, गुन्हे प्रकटीकरण पथक यांची वेगवेगळी पथके तयार करुन तपास करण्यात आला. तांत्रिक तपासाचे मदतीने तसेच गोपनिय माहितीचे आधारे नमुद गुन्हयाचा सखोल तपास करण्यात आला असता काही संशयीत इसमांची नावे समोर आली. नमुद संशयीत इसमांना ताब्यात घेऊन शिळ डायघर पोलीस ठाणेस आणुन त्यांच्याकडे सखोल तपास केला असता त्यातील दोन इसमांनी नमुद गुन्हा केल्याची कबुली दिली आहे. नमुद दोन्ही आरोपीत यांना अटक करण्यात आली आहे.

**अटक आरोपीत यांची नावे**

१) रमजान मोहम्मद कुददुस शेख, वय-२० वर्षे, धंदा-बिगारी, रा.ठी. गल्ली नं.०३, अबीदभाई चाळ, ठाकूरपाडा, पो. दहीसर, ता.जि.ठाणे

२) मोहम्मद आझाद कुददुस शेख, वय-३० वर्षे, धंदा-बिगारी, रा.ठी. गल्ली नं.०३, अबीदभाई चाळ, ठाकूरपाडा, पो. दहीसर, ता.जि.ठाणे

**गुन्हयाचा उद्देश :-** नमुद आरोपीत इसम व बळीत इसम हे ठाकुरपाडा (पिंपरी) या एकाच परिसरात रहाणारे असुन एकमेकांना ओळखत आहेत. आरोपीत क्र. ०१ याने बळीतास प्रलोभन दाखवुन निर्जन स्थळी नेले. त्या ठिकाणी आरोपीत क्र. १ याने बळीत मुलावर अनैसर्गिक संभोग करण्याच्या हेतुने त्याची पॅन्ट काढली असता बळीताने त्यास विरोध केला म्हणुन आरोपीने त्याचे डोक्यात दगडाने मारुन त्यास बेशुध्द केले व कपडयाने त्याचा गळा आवळुन त्यास जिवे ठार मारले. बळीत मुलाची हत्या करुन त्याच्या प्रेताची विल्हेवाट लावण्यासाठी आरोपीत क्र.०१ याने त्याचा सख्खा भाउ आरोपीत क्र.०२ यास मदतीला बोलावुन घेतले व आरोपीत क्र. ०२ याच्या मदतीने बळीताचे हात पाय बांधुन त्यास ओढयाच्या डबक्यात पाण्यात फेकुन दिले. सदर गुन्हयात आणखी कुठल्या आरोपींचा सहभाग आहे का याबाबत तपास चालु आहे.

सदरची यशस्वी कामगिरी मा.पोलीस आयुक्त श्री.आशुतोष डुंबरे, मा. पोलीस सह आयुक्त श्री ज्ञानेश्वर चव्हाण, मा.अप्पर पोलीस आयुक्त श्री विनायक देशमुख, मा. पोलीस उप आयुक्त श्री. सुभाष बुरसे, परिमंडळ १, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. उत्तम कोळेकर, कळवा विभाग, शिळ डायघर पो.स्टे.चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदिपान शिंदे, पो.नि.(गुन्हे)सुनिल वरुडे यांच्या मार्गदर्शनाखाली शिळ डायघर पो.स्टे. अंतर्गत तपास पथकातील स.पो.नि. महेश काळे,सपोनि अब्दुल मलीक, स.पो.नि.अभिषेक नामपल्ले, तसेच तपास पथकातील अंमलदार पो. हवा. महेंद्र गायकवाड, पो.हवा. गोविंद पाटील,पो.हवा.राकेश सत्रे, पो.हवा. सचिन कोळी, पो.हवा. सुशांत पाटील,पो.ह.अमोल पवार,पो.ह.हनुमंत मोरे,पो.ना.कृष्णा बोराडे, पो.शि. राजेंद्र सोनवणे,पो.शि.अक्षय पाडळे.पो. ना./समाधान माळी, यांनी सदर गुन्हयाचा कौशल्यपूर्ण तपास  करून गुन्हा उघडकीस आणला आहे.

----------------